| MHSN060005842021 | R.C.S. 61/2021<br>Kamal Madhukar Yesumali Vs. Shankar Balu Nandanikar |
|---|---|

## निशाणी ५१ वरील आदेश

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश–६, नियम–१७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी केला आहे.

०२. वादीने असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा दाखल करणेपूर्वी वादी व प्रतिवादी नं. १ व २ यांच्या बहिणी श्रीमती सोनाबाई बाबू डोंगरे व सौ. रुक्मिणी वसंत माळी या बहीणींनी त्यांचा हिस्सा रजिस्टर दस्त क्र. १४२/२०१५ दिनांक ०७.०१.२०१५ रोजीचे रजिस्टर हक्कसोडपत्राने सोडून दिलेला होता. दावेपूर्वी या वादीनी प्रतिवादीना दिनांक २८.१२.२०२० रोजी नोटीस दिली. त्यास प्रतिवादी नं. १ व २ यांनी त्यांचे वकिलांचेमार्फत दिनांक १८.०१.२०२१ रोजीची उत्तरी नोटीस दिलेली असून हक्कसोडपत्र केलेचे प्रतिवादीने मान्य केलेले आहे. सदरचा दावा या वादीनी दिनांक ०३.०३.२०२१ रोजी दाखल केला. त्यानंतर प्रतिवादीनी मिळकत हस्तांतर करणेचे व कर्ज बोजे करणेचे प्रयत्न सुरु केले. त्यामुळे वादीने निशाणी २७ कडे ताकीदीचा अर्ज केला. त्यावर दिनांक ०८.०४.२०२१ रोजी प्रतिवादी नं. १ ते ५ विरुध्द न्यायालयाने अंतरीम मनाई दिली. प्रतिवादीना नोटीसा बजावल्या व त्यांनी हजर होऊन दिनांक ०२.०७.२०२१ रोजी ताकीद अर्जास म्हणणे दाखल केलेले आहे व त्यामध्ये वर नमूद श्रीमती सोनाबाई व रुक्मिणी या बहीणीनी करुन दिलेल्या हक्कसोडपत्राबाबत रे.दि.मु. नं. ८०/२०२१ चा दावा झालेचे व या निकालानुसार हक्कसोडपत्र रद्द झालेचे नमूद केलेले आहे. त्यामुळे या वादीनी सदर दावेच्या नकला उपलब्ध करुन घेतल्या असता प्रतिवादी नं. १ व २ यांनी बहिणींशी संगनमत करुन दावा दाखल करणेस भाग पाडून त्यामध्ये तडजोड हुकुमनामा करुन घेतला आहे. त्यामुळे दाव्यामध्ये आवश्यक दुरुस्ती करणे आवश्यक झालेले आहे. सदरच्या दुरुस्तीमुळे वादीचा दावा व त्यामध्ये वादीने मांडलेली भूमिका यामध्ये कोणताही बदल होत नाही अगर दावेच्या निकालावर कोणताही परिणाम होत नाही. सबब वादीने अर्जात नमूद केलेप्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेची विनंती केली आहे.

०३.　　प्रतिवादी नं. १ ते ३ तर्फे सदर अर्जास म्हणणे (निशाणी ६२) वर दाखल करुन आक्षेप घेतला आहे. त्यांचे पुढे कथन आहे की, वादीने नियमित दिवाणी दावा नं. ८०/२०२१ या दाव्याची व त्या दाव्याचा निकाल दिनांक ०८.०४.२०२१ रोजी झाला होता याची माहिती त्याचवेळेस वादींना होती. तसेच पुढे कथन केलेले आहे की, सद्यपरिस्थीतीत वादी यांनी प्रतिवादी नं. १ ते ३ यांनी निशाणी ५ च्या अर्जास म्हणणे दिले त्यावेळी दावेसंदर्भात माहिती झाली अशी वस्तुस्थिती नाही. तसेच पुढे कथन केले की, वादीला रुक्मिणी व सोनाबाई यांना दावा करतेवेळी प्रतिवादी म्हणून सामील करणे आवश्यक होते. वर नमूद विषय वगळता अर्ज कलम १ मध्ये नमूद केलेले अन्य कथन सर्वसाधारणपणे खरे व बरोबर असल्याचे कथन केलेले आहे. सबब अर्ज फेटाळणेस पात्र आहे. मात्र न्यायालयाने अर्ज मंजूर करणेचे निर्णयाप्रत आलेस वादीवर १०००/– रुपये कॉस्ट बसविणेत यावी अशी विनंती केली आहे.

०४.　　प्रतिवादी नं. ५ व १५ यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन आक्षेप घेतला आहे. त्यांचे पुढे कथन आहे की, वादीने दाखल केलेला अर्ज खोटा व चुकीचा असून या प्रतिवादींना तो मान्य व कबूल नाही. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा ही विनंती.

०५.　　वादीचा अर्ज, त्यावरील प्रतिवादींचे म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला. यातील वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा दावामिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप होऊन मिळणेकरीता तसेच निरंतर ताकीद मिळणेकरीता दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे कामी वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दिनांक ०९.०७.२०२१ रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास प्रतिवादीतर्फे दिनांक १५.०७.२०२१ आणि १८.०८.२०२१ रोजी म्हणणे सादर करण्यात आलेले आहे. त्यानंतर सदरचा अर्ज हा प्रलंबित होता. सदर दाव्याचे कामी निशाणी ५ वर दिनांक १६.१०.२०२१ रोजी आदेश पारीत झालेला आहे. त्यानंतर दाव्याचेकामी निशाणी ८३ खाली दिनांक १९.११.२०२२ रोजी वादप्रश्न निश्चित केल्याचे दिसून येते. त्यानंतर यातील वादी यांनी निशाणी ८५ खाली दिनांक २५.१०.२०२३ रोजी आपली सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केल्याचे दिसून येते. त्यानंतर वादी हिचा प्रतिवादी नं. १ ते ३ तर्फे वकिलांनी उलटतपास घेतल्याचे व सदरचा उलटतपास हा दिनांक २१.११.२०२३ रोजी पूर्ण झाल्याचे दिसून येते. त्यानंतर इतर प्रतिवादींतर्फे उलटतपास घेण्यात न आल्याने त्यांचेविरुध्द दिनांक ०६.१२.२०२४ रोजी उलटतपास नाहीचा आदेश झाल्याचे दिसून येते. त्यानंतर सदरचे प्रकरण

हे वादी यांच्या पुढील पुराव्याकरीता प्रलंबित असताना सदरच्या अर्जावर वादी व प्रतिवादीतर्फे वकिलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

**०६.** वादीचे कथन असे आहे की, दावा दाखल करण्यापूर्वी वादी व प्रतिवादी नं. १ व २ यांच्या बहिणी सोनाबाई डोंगरे व रुक्मिणी माळी यांनी त्यांचा हिस्सा रजिस्टर हक्कसोडपत्राने सोडून दिलेला होता. सदरच्या हक्कसोडपत्राबाबत प्रतिवादी नं. १ व २ यांनी त्यांचे वकिलांमार्फत पाठविलेल्या उत्तरी नोटीशीमध्ये मान्य केलेले आहे. त्यानंतर वादीचे कथन आहे की, सोनाबाई व रुक्मिणी या बहिणींनी करुन दिलेल्या हक्कसोडपत्राबाबत नियमित दिवाणी दावा नं. ८०/२०२१ हा दावा झाला व त्या दाव्याच्या कामी झालेल्या निकालानुसार हक्कसोडपत्र झाल्याचे नमूद केलेले आहे. तसेच पुढे कथन केलेले आहे की, प्रतिवादी नं. १ व २ यांनी बहिणींशी संगनमत करुन बहिणींना दावा दाखल करण्यासाठी भाग पाडून तडजोड हुकुमनामा करुन घेतलेला आहे. त्यामुळे सदर सोनाबाई व रुक्मिणी यांनी दाव्याचे कामी पक्षकार करणे आवश्यक असल्याचे कथन केलेले आहे. तसेच दावेपूर्वी नोंदणीकृत हक्कसोडपत्र असलेने त्यांना पक्षकार केलेले नव्हते. परंतु सद्यपरिस्थीतीत सदर सोनाबाई व रुक्मिणी यांना पक्षकार करणे आवश्यक असल्याचे कथन केलेले आहे. यातील प्रतिवादी यांचे म्हणण्याचा विचार करीता प्रतिवादी यांनी वादी यांना दाव्याची माहिती होती परंतु प्रतिवादी नं. १ ते ३ यांचे म्हणण्यावरुन दाव्यासंदर्भात माहिती झाली अशी वस्तुस्थिती नसल्याचे कथन केलेले आहे.

**०७.** यातील वादी यांच्या दाव्यातील वाद कथने पाहता, सोनाबाई व रुक्मिणी यांनी त्यांचा दावामिळकतीमधील हक्क व हिस्सा नोंदणीकृत दस्त क्र. १४२/१५, दिनांक ०७.०१.२०१५ या हक्कसोडपत्रानुसार सोडून दिलेला असल्याचे कथन केलेले आहे. त्याबाबत वादी यांनी अभिलेखावर सदर हक्कसोडपत्राची सहिशिक्याची नक्कल अभिलेखावर दाखल केलेली आहे. सदर हक्कसोडपत्राद्वारे सोनाबाई डोंगरे आणि रुक्मिणी माळी यांनी दावामिळकतीमध्ये त्यांचा हक्क व हिस्सा सोडून दिल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे अभिलेखावरील नियमित दिवाणी दावा नं. ८०/२०२१ या दाव्यातील दाव्याची आणि आपसात तडजोड हुकुमनाम्याची सहिशिक्याची नक्कलेचे अवलोकन केले असता, वाद मिळकतीसंदर्भात सोनाबाई आणि रुक्मिणी आणि प्रतिवादी नं. १ व २ यांचेदरम्यान झालेले दिनांक ०७.०१.२०१५ रोजीचे हक्कसोडपत्र रद्द

झालेबाबत आपसात तडजोड हुकुमनामा झाल्याचे दिसून येते. सदरचा दावा हा दावामिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप होऊन मिळणेकरीता दाखल करण्यात आलेला आहे. सद्यपरिस्थीतीत अभिलेखावरील कागदपत्रे पाहता सोनाबाई व रुक्मिणी यांनी प्रतिवादी नं. १ व २ यांना करुन दिलेले नोंदणीकृत हक्कसोडपत्र हे तडजोड हुकुमनाम्याद्वारे रद्द झाल्याचे दिसून येते. त्यामुळे वादी यांच्या विनंतीप्रमाणे श्रीमती सोनाबाई बाबू डोंगरे ही मयत झाली असल्याने तिचे वारस आणि रुक्मिणी वसंत माळी यांना दाव्याचे कामी प्रतिवादी नं. २१/१ ते २१/३ व प्रतिवादी नं. २२ म्हणून सामील करणे आवश्यक आहे असे वाटते. त्याचप्रमाणे श्रीमती सोनाबाई बाबू डोंगरे हिचे वारस महादेव बाबू डोंगरे हे दाव्याचे कामी प्रतिवादी नं. ५ म्हणून सुरुवातीपासून पक्षकार असल्याचे दिसून येते. त्यामुळे दाव्याचे स्वरुप पाहता वादी यांनी अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करणेस परवानगी देणे आवश्यक असे वाटते. सदरची दुरुस्ती केलेस दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही फरक पडत नाही. तसेच वादप्रश्नाचा योग्य त–हेने न्यायनिवाडा होणेसाठी सदरची दुरुस्ती आवश्यक आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | वादीचा निशाणी ५१ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | वादीने दाव्यामध्ये विहीत कालावधीत दावा दुरुस्ती अर्जामध्ये नमूद केलेप्रमाणे नियोजीत दुरुस्ती करणेस परवानगी देण्यात येते. |
| ३. | वादीने दुरुस्त वादपत्राची प्रत न्यायालयासाठी व प्रतिवादीसाठी दयावी. |

ANIRUDHA SUNIL RANE
Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE
Date: 2026.02.20 12:06:33 +0530

ठिकाण –मिरज.
दिनांक –१७.०२.२०२६.

(अनिरुध्द एस. राणे)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, मिरज.

-

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Mr. S. S. Shingana |
| Name of Court | :- | Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Miraj, Dist. Sangli. |
| Date of decision / typed | :- | 17.02.2026 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 20.02.2026 |
| Judgment/order uploaded on | :- | 20.02.2026 |